# अज्ञात हेर

**गुरुनाथ नाईक**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B258

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अज्ञात हेर : गुरुनाथ नाईक**

© **गुरुनाथ नाईक**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये १९०/-

## अनुक्रमणिका

अज्ञात हेर / ५
दोन गोलंदाज / ७३
झुंजार योद्धा / १४३

# अज्ञात हेर

# १

मेजर चक्रवर्ती शांत स्वभावाचे आणि नेहमी थंड आवाजात बोलणारे म्हणून प्रत्येकजण त्यांना ओळखत होता. यात कधीही फरक पडलेला अद्याप तरी कुणी पाहिलेला नव्हता. त्यांच्यावर एक अत्यंत महत्त्वाची अशी कामगिरी येऊन पडलेली होती. जवळजवळ साडेसहाशे किलोमीटर लांबीचा हिमालयाच्या कुशीतून जाणारा एक रस्ता आखण्याचे काम त्यांच्यावर सोपवण्यात आलेले होते. त्यांच्या मदतीसाठी सात जणांची एक युनिटदेखील देण्यात आलेली होती.

तो चाळीस फूट रुंदीचा रस्ता कोणत्या मार्गाने जाणार आहे आणि नेमका कोणत्या ठिकाणी तयार करण्यात येणार आहे याची माहिती कुणालाही नव्हती. काम पूर्ण झाले की, आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना अहवाल सादर करायचा अशी त्यांची कामगिरी होती. जवळजवळ आठ महिन्यांच्या कामगिरीनंतर ते आपली युनिट घेऊन आसाममध्ये उतरले. शिलाँगमध्ये त्यानी मुक्काम ठोकला. पंधरा दिवस फक्त विश्रांती घ्यायची आणि मग अहवाल तयार करायला सुरुवात करायची हाच विचार त्यांनी केलेला होता.

त्यांचा मुक्काम मिलिटरी कॅम्पमधील बंगल्यात नव्हता, तर त्यांनी फॉरेस्ट खात्यातील शहरापासून दूर एकांतात असलेला बंगला पंधरा दिवसांसाठी घेतलेला होता. कॅम्पमध्ये आपल्याला आणि युनिटला मुळीच विश्रांती मिळणार नाही, अशी त्यांची कल्पना होती.

युनिटमधील सात जणांतील पाच जण जवळपास असणाऱ्या आपल्या मित्रांना आणि नातलगांना भेटण्यासाठी गेलेले होते. पण सोळाव्या दिवशी मात्र हजर झाले पाहिजे, अशी सक्त ताकीद मेजर चक्रवर्तींनी त्यांना दिलेली होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी अकराच्या सुमाराला ते पुस्तक वाचीत आराम खुर्चीत बसलेले असताना काहीतरी खरखरल्यासारखा आवाज त्यांनी ऐकला. त्यावेळी त्याच्या युनिटमधील उरलेले दोघे जण शहरात भटकण्यासाठी निघून गेलेले होते. बंगल्यातील कूक आपल्या जोडीदाराला घेऊन किचनमध्ये काम करीत होता. किचन होते बंगल्याच्या बाजूला, बंगल्यापासून आठ-दहा फुटांवर... आऊट हाऊसमध्ये.

त्यांनी कान टवकारले. एक दोन मिनिटे नीट कानोसा घेतला आणि तेवढ्या अवधीत आणखीन दोनदा त्यांना तोच आवाज ऐकू आला. उघडलेले पुस्तक मिटून त्यानी टी पॉयवर ठेवले आणि कानोसा घेत ते उठून उभे राहिले. एकाचवेळी अनेक शंका त्यांच्या मनात उभ्या राहिल्या. त्यांनी कोपऱ्यातील मेजावर असलेला ट्रान्झिस्टर बंद असल्याची खात्री केली. टेलिफोनमधून तसा आवाज येणे तर शक्यच नव्हते. विजेच्या स्विचबोर्डाकडे जाऊन त्यांनी बारकाईने नजर टाकली. कुठे शॉर्ट सर्किट असेल तर असा आवाज येऊ शकेल, अशी शंका त्यांच्या मनात आली. शोध घेण्याचे सारे प्रयत्न फुकट गेले.

अधूनमधून तो आवाज ऐकू येतच राहिला. ते पार गोंधळून गेले. शेवटपर्यंत काहीच त्यांच्या लक्षात आले नाही. एकाएकी दचकून त्यांनी डोक्यावरच्या तुळईकडे पाहिले. तो आवाज वरून कुठून तरी आला असावा अशी शंका त्यांना आली आणि त्यांच्या तीक्ष्ण नजरेने भिंतीवरून तुळईकडे आणलेली एक काळ्या रंगाची केबल टिपली.

त्या केबलचा कोणताही अर्थ ते लावू शकले नाहीत. दिव्यांशी किंवा पंख्याशी त्या केबलचा कोणताही संबंध नव्हता. टेलिफोनशीसुद्धा त्या केबलचा काही संबंध नसल्याचे चक्रवर्तींच्या नजरेला आले.

बेडरूममधील छोटे टेबल आणून त्यांनी तुळईखाली ठेवले. त्या टेबलावर एक स्टूल ठेवून मेजर चक्रवर्ती वर चढले. तुळईवरून गेलेली केबल हात न



लावता त्यांनी बारकाईने न्याहाळली. त्या रुंद तुळईच्या वरच्या बाजूला ट्रान्झिस्टरसारखी एक वस्तू पाहून त्यांना आश्चर्य वाटल्यावाचून राहिले नाही. कारण त्याच ट्रान्झिस्टरमधून खरखर आल्याचे त्यांना प्रत्यक्षपणे जवळून पाहता आले.

खाली उतरून चक्रवर्ती बंगल्याच्या बाहेर आले. जिथून ती आत शिरली होती तिथूनच ती भिंतीतून बाहेर आलेली त्यांनी पाहिली. केबलच्या थोडासा भाग चुकू न बाहेर आलेला त्यांना दिसून आला. भिंतीजवळूनच वर पाहात ते बंगल्याच्या मागच्या कोपऱ्यावर आले. तिथून ती केबल एका झाडावर गेलेली त्यांना दिसून आली.

त्याठिकाणी सहजासहजी कुणीच येण्याची शक्यता नव्हती. केबल कुठे गेलेली आहे हे पाहण्यासाठी ते बंगल्याच्या कुंपणाबाहेर आले. बंगल्यापासून साधारण तीस-चाळीस फुटांवर तारांचे कुंपण होते. त्या कुंपणापासून आणखीन पंचवीस तीस पावलावर ते आले. आणि ती केबल तशीच झाडावरून पुढे गेलेली आहे हे त्यांना दिसून आले.

तसेच ते बंगल्यात आले. बेडरूममधून त्यांनी आपला चाकू आणला. बंगल्याच्या बाहेर पडलेली एक लांब काठी त्यांनी उचलली आणि कुंपणाच्या आतल्या बाजूला असलेल्या एका झाडावर चढले. काठीचा उपयोग नाही असे दिसून येताच त्यानी ती फेकून दिली. आरामात झाडाच्या एका फांदीवर ती केबल दाबून त्यानी ती चाकूने कापून टाकली. बंगल्यात येऊन पुन्हा ते मेजावर ठेवलेल्या स्टुलावर चढले.

जवळजवळ सात मिनिटे ते स्टुलावर उभे होते पण एकदाही खरखर ऐकू आली नाही. तुळईवरच त्यांनी त्या यंत्रापासून दोन अडीच फूट लांबीवर केबल कापली. तो ट्रान्झिस्टर घेऊन ते खाली उतरले. स्टूल आणि टेबल जागच्या जागी ठेवून दिले.

आपले बोलणे कुणीतरी चोरून ऐकण्याचा प्रयत्न करीत आहे याची कल्पना मेजर चक्रवर्तींना आली. त्यांनी आपल्या अंगावर असलेल्या कामगिरीचा विचार करून आपल्याला नेमका कोणता धोका आहे याचा अंदाज घेतला. घाईघाईत ते बेडरूममध्ये आले. त्यांनी कपाटात ठेवलेली

आपली सुटकेस बाहेर काढली. त्या सुटकेसमध्ये असलेल्या तीन फायली काढल्या. त्या जाडजूड फायली त्यांनी नीट रद्दी कागदात गुंडाळल्या. आणि मिलिटरी कॅम्पला फोन केला. त्यावेळी ते पूर्वीसारखेच अगदी शांत होते. घडलेल्या घटनेचा कोणताही परिणाम त्यांच्या मनावर झालेला नव्हता.

शहरात गेलेले त्यांचे दोन्ही साथीदार बंगल्यात आले. मेजर चक्रवर्तींनी घडलेल्या घटनेची काहीही कल्पना त्यांना दिली नाही. आपण उशिरा जेवायला येणार इतकेच त्यांना सांगितले. दीडच्या सुमाराला एक जीप बंगल्याच्या दारात येऊन थांबली. हातातील गठ्ठा घेऊन ते जीपमध्ये बसले. तेव्हा कोटाच्या आतल्या खिशात तुळईवर सापडलेले यंत्र ठेवलेले होते.

पंधरा मिनिटांनी ते कर्नल साहेबांच्या केबिनमध्ये शिरले. कर्नल नायडूंना ते आळखत होते, पण नायडू मात्र चक्रवर्तींना ओळखत नव्हते दोन दिवसापूर्वीच ते नायडूंना भेटले होते आणि कागदपत्रे त्यांना दाखवलेली होती.

'सर, त्या बंगल्यात मला हे यंत्र सापडलं. अत्यंत शक्तीमान असा हा माईक असावा. यात किंचित असा बिघाड झाल्यामुळेच मला याचं अस्तित्व समजलं.' मेजर चक्रवर्तींनी काय घडले हे थोडक्यात सांगून टाकले.

त्याच कर्नलच्या ओळखीने मेजर चक्रवर्ती एका बँकेत आले. एक लॉकर त्यानी मिळवला. हातातील पुडके त्या लॉकरमध्ये टाकून ते समाधानाने पुन्हा कर्नल साहेबांकडे आले. बँकेतील लॉकरची चावी त्यांनी त्यांच्या स्वाधीन केली. आणि इतके करून साडेतीन वाजता ते बंगल्याकडे आले. त्यावेळी त्यांच्या मनावर कसले तरी दडपण आलेले होते.

आपल्यावर कुणाची तरी सतत नजर आहे, नजर ठेवणारे आपल्या बंगल्यातसुद्धा प्रवेश करू शकतात हे लक्षात आल्यामुळेच त्यांना धोका जाणवू लागला होता.

कारण, रस्त्याची आखणी करताना काहीही घडू शकेल याची जाणीव कामगिरी अंगावर टाकताना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांना दिली होती. इतकेच नव्हे तर अनेक पद्धतीच्या धोक्याची जाणीवदेखील वरिष्ठांनी त्यांना दिलेली होती आणि म्हणूनच तर त्यांच्या मनावरचे दडपण मनात विचार येतील तसतसे वाढत होते.



आपण जी खबरदारी घेतली ती योग्य असल्याची जाणीव त्यांना झाली. आपण तयार केलेल्या नोटस्‌ह्र नाहीशा झाल्या तर पुन्हा पाहणी केल्याशिवाय आपण वरिष्ठांना अहवाल देऊ शकणार नाही, याच जाणिवेमुळे त्यांनी ही काळजी घेतली होती.

संध्याकाळी साडेपाच वाजता खास मेजर चक्रवर्तीसाठी एक जीप पाठवण्यात आली. जीप ठेवून घेतली पण त्यानी ड्रायव्हरला मात्र परत पाठवले. संध्याकाळी साडेसहा वाजता ते कॅम्पमध्ये आले. त्यांनी कर्नल साहेबांकडे दिलेला माईक एका मेजरकडे पोचलेला होता आणि त्याने फोनवरून आपण त्या यंत्राची तपासणी केली याची कल्पना दिलेली होती. बंगल्याबाहेर पडण्याचा कंटाळा आलेला असला तरी केवळ कुतूहल शमवण्यासाठी ते मेजर कश्यपकडे आले.

'चक्रवर्ती, बंगल्यात कुठंही झालेलं बोलणं ऐकता येईल इतका हा माईक शक्तिमान आहे. हा माईक जपानी बनावटीचा आहे. तो बसवताना हातातून पडलेला असावा. त्यामुळे चालू केला की थोडीशी खरखर यातून ऐकू येते.'

अर्ध्या तासाने ते पुन्हा बंगल्यावर आले. त्यावेळी ठरलेली योजना त्यांच्या डोक्यात घोळत होती. अंधार पडल्यानंतर ती केबल कोणत्या ठिकाणी गेलेली आहे हे शोधून काढण्याचा विचार त्यांनी केलेला होता.

आठ वाजता त्यांनी गरम सूट अंगावर चढवला. प्रखर विजेची बॅटरी घेतली. रिव्हॉल्व्हर खिशात टाकले आणि सहज पाय मोकळे करण्यासाठी आपण जात आहोत असे सांगून बाहेर पडले. त्यावेळी त्यांना मुळीच भीती वाटत नव्हती. आपण सावधगिरी बाळगली तर आपल्याला कोणताही धोका नाही हे त्याना पटलेले होते. भलामोठा वळसा घालून फिरत फिरत ते बंगल्याच्या कुंपणापासून पंधरा-वीस फुटांवर असलेल्या एका झाडाखाली आले. त्या झाडापर्यंत गेलेली केबल त्यांनी पाहिली होती. बॅटरीचा उजेड टाकीत ते बरेच अंतर चालून गेले आणि झुडुपाने वेढलेल्या एका झाडाच्या मुळाशी ती केबल आलेली त्यांनी पाहिली. तिथं मात्र ती जमिनीवरून नेण्यात आलेली होती.

बॅटरीच्या उजेडात केबलचा शोध घेत जाणे हे त्यांना धोक्याचे वाटत होते. झाडाखाली उभे राहून विचार करीत असतानाच आपण कुणाला तरी मदतीला बोलवायला हवे होतं हा विचार राहून राहून त्यांच्या मनात येत होता. पण आता इथपर्यंत आलोच आहोत, असेच पुढे जावे हा विचार त्यांनी केला. फिरत फिरत ते ओबडधोबड आणि अवघड मार्गाने टेकाड उतरून पलीकडच्या मार्गावर आले. बॅटरी मालवून त्यानी खिशात टाकली. आपण एका झोपडीपासून केवळ पन्नास साठ फुटांवर आहोत याची जाणीव जेव्हा त्याना झाली तेव्हा नकळत ते सावध बनले. आणि आपण निष्कारण धोका पत्करीत आहोत ही जाणीव पुन्हा एकदा त्यांच्या मनाला झाली.

खाली पडलेली केबल त्याने एका हातात उचलून धरली. ती केबल ओढली जाणार नाही याची काळजी घेत वर उचलूनच टेकाड उतरू लागले. आपण पाहिलेली ती झोपडी अगदी छोटी नसून दोन-तीन खणाचे घर आहे हे त्यांनी ओळखले. उघड्या खिडकीत उजेड दिसत होता. पण त्या खिडकीत कसलीच हालचाल दिसत नव्हती. जवळजवळ दहा पंधरा मिनिटे ते एकाच जागेवर हालचाल न करता बसून राहिले. कारण, एकदम घराजवळ जाणे त्यांना आवडले नाही. आत किती माणसे आहेत हे त्यांना ठाऊक नव्हते. त्या घरात राहणारी माणसे कोणत्या तयारीची असतील याची कल्पना त्यांना नव्हती. अधूनमधून मन पुढे जायला कच खात होते. अधूनमधून धोक्याची जाणीव मनात मूळ धरीत होती.

आपण पुढे जाऊ नये, बंगल्यावर जावे आणि कॅम्पमधून मदतीला सात आठ शिपायांची कुमक आणावी हा विचार त्यांनी केला. तसेच ते माघारी फिरले. आणि टेकडी चढू लागले तेव्हा ते बेहद्द खूश झालेले होते. पलीकडचा उतार सुरू झाला की धावत बंगला गाठण्याचा विचार त्यांनी केलेला होता.

एकाएकी त्यांची पावले थबकली. अंगावर सरसरीत काटा उभा राहिला. कानात शिरलेला भेदक आवाज आला कुठून हेच मुळी त्यांच्या लक्षात आले नाही.

‘मेजर, हात वर करा आणि जागच्या जागी उभे राहा. हालचाल केलीत तर शरीराची चाळण बनेल. दुसऱ्यांदा हुकूम झाला. चक्रवर्तींचे



दोन्ही हात आपोआप वरती झाले. बॅटरीचा झगझगीत झोत त्याच्यावर सोडण्यात आला.

कुणीतरी दोन व्यक्ती त्यांच्या अगदी जवळ आल्या. बॅटरीचा उजेड सोडणारा मात्र पूर्वीच्याच जागी थांबलेला होता.

एकाने त्यांचे खिसे चाचपले. बॅटरी आणि रिव्हॉल्व्हर काढून घेण्यात आले. त्या घराकडे चालण्याचा हुकूम झाला. मुकाट्याने त्यांनी उतारावरून चालायला सुरुवात केली. नेहमीसारखे हात खाली घेतले. तरीही कुणी अटकाव केला नाही.

त्यांचा घरात प्रवेश झाला तेव्हा सुरुवातीला घाबरलेले मेजर चक्रवर्ती अगदी शांत बनलेले होते. समोर आलेल्या प्रसंगाला थंड डोक्याने तोंड देण्याचा निर्णय त्यांच्या मनाने घेतलेला होता. हुकमी आवाजात बोलणारा तरुण बडा अधिकारी असावा हे चक्रवर्तींनी ओळखले. बाकीचे तिघेजण मात्र त्या मानाने सामान्य होते. आपण कोणत्याही परिस्थितीत या चौघांना टक्कर देऊन सुटका करून घेऊ शकणार नाही, याचीही पक्की जाणीव त्यांना झालेली होती.

‘मेजर, माईक कापण्यात आला हे आम्ही ओळखलेलं होतं. तुम्ही फौज घेऊन याल अशी आमची अपेक्षा होती.’ तो तरुण गंभीरपणे बोलला. आपल्याला तो अगदी आदराने वागवित असल्याचे चक्रवर्तींला जाणवले.

‘माझं बोलणं चोरून ऐकण्याचा तुमचा उद्देश काय?’ चक्रवर्तींने थंड आवाजात विचारले.

‘मेजर, या प्रश्नाचं उत्तर मी देऊ शकत नाही. ते तुम्हालाही ठाऊक आहे. प्रथम तुमच्याशी सौदा ठरवावा अशी माझ्या अधिकाऱ्यांची इच्छा आहे.’

‘कसला सौदा?’

‘ज्या रस्त्याचा तुम्ही सर्वे केलात त्या फायली मला हव्यात. त्यासाठी तुम्हाला फार मोठी रक्कम देण्याचा अधिकार मला देण्यात आला आहे.’

‘त्या फायली माझ्याजवळ नाहीत.’

‘त्या तुमच्याजवळ आहेत. तुमच्या कपाटात ठेवलेल्या सुटकेसमध्ये त्या तीन फायली आहेत.’